# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

## जाहिरात

## भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७** इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरुन (एन.एस.पी ) मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.** नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

नवीन मंजूरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी SSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०$^{th}$ Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फम केवळ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बोर्डचे (HSC) विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५ करीता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal)अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ.क्र | कार्यसूची | अंतिम दिनांक<br>**नवीन शिष्यवृत्ती** (Fresh) **व नूतनीकरण शिष्यवृत्ती** (Renewal) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१.१०.२०२४ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावते.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी **www.scholarships.gov.in** हे संकेतस्थळ अवलोकन करावे. तसेच संकेतस्थळावर दिसणाऱ्या **Helpline No. 0120-6619540** या क्रमांकावर किंवा **helpdesk@nsp.gov.in** या ई-मेल वरुन संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक 020-29707098/26126939 वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. केंद्रशासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या नवीन सूचनांसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in व www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

(सदर शिष्यवृत्तीबाबतचे सविस्तर परिपत्रक संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करुण देण्यात येईल.)

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 16-07-2024 13:14:07

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१